Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# वसंतराव चव्हाण यांच्या निवडणुकीतील कामगिरी एक अभ्यास

**संशोधक**
**साईनाथ मनोहर गायकवाड**

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. संगीता संदीप शिंदे**
प्रोफेसर, इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड
ता.नांदेड जि.नांदेड.

**प्रस्तावना**

वसंतराव चव्हाण यांच्या राजकीय जडणघडणीचा अभ्यास करीत असताना राजकीय नेतृत्वाच्या संकल्पनेचा आढावा घेणे महत्त्वाचे असते. कारण राजकीय नेतृत्व आणि सामान्य जनता यांचे घनिष्ट नाते असते. नेतृत्वविहीन समाज आणि राष्ट्र आपली प्रगती करु शकत नाही. त्यामुळे मानवी समाजाच्या वाटचालीत नेतृत्वाचे स्थान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जगातील प्रगत आणि अप्रगत राष्ट्रांच्या प्रगती आणि मागासलेपणात तेथील साधनसंपत्ती व परिस्थिती तितकीच नेतृत्वाची भूमिका ही कारणीभूत आहे. राजकीय नेतृत्वाची संकल्पना ही व्यापक असून त्याबाबत पाश्चात्त्य आणि भारतीय चिंतन परंपरेत अनेकांनी आपले वैचारिक योगदान दिलेले आहे. राजकीय नेतृत्वाबाबद्चे चिंतन हे स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत आले आहे. भारतातील ब्रिटिश साम्राज्यवादाचे दीर्घकालीन अस्तित्व आणि त्याचा प्रतिरोध करण्यातून उदयास आलेल्या राजकीय नेतृत्वाने स्वातंत्र्य चळवळीस आणि स्वातंत्र्य आंदोलनास दिशा दिली. एवढीच नव्हे, तर स्वातंत्र्योत्तर भारताचे दीर्घकाळ नेतृत्वही केले. राजकीय नेतृत्व ही एक वैश्विक घटना असून नेतृत्वाचा संबंध हा व्यक्तीच्या व्यक्तित्वाशी असतो. सामुहीक लक्ष्य प्राप्तीसाठी संघटनेची आणि संघटनेसाठी प्रभावी नेतृत्वाची गरज असते. त्याशिवाय, त्या समूहाला संघटनेला आपली ध्येय, उद्दिष्टे गाठता येत नाहीत. नेतृत्व ही विशिष्ट परिस्थितीची गरज असते. नेता हा जसा विशिष्ट परिस्थितीचा गुलाम असतो. तसाच तो परिस्थितीचे अपत्यसुध्दा असू शकतो. "नेतृत्व हे जन्मजात असू शकत नाही. विशिष्ट राजकीय घराण्यातील वारसांकडे प्रभावशाली नेतृत्वगुण जन्मजात असू शकतात. पण ते असतातच असे नव्हे."[१] कोणत्याही समाजात नेतृत्व हे समाजाच्या विकासासाठी आवश्यक असते. "नेतृत्वाची आवश्यकता नाही असा समाजच असू शकत नाही. समाजाच्या राजकीय व्यवस्थेच्या कार्यप्रणालीच्या नियंत्रणासाठी नेतृत्व हवेच असते. नेतृत्वस्थानी असलेल्या व्यक्तीला काही अधिकार प्राप्त होतात. आणि त्या व्यवस्थेत त्याचे एक निश्चित स्थान निर्माण होते. नेतृत्व आपल्या अनुयायी समर्थकांकडून जशी ऊर्जा प्राप्त करतो तसेच अनुयायांतील ऊर्जेला निश्चित दिशा प्राप्त करुन देते." याच अनुषंगाने वसंतराव चव्हाण यांनी लढविलेल्या निवडणुकीचा अभ्यास खालील घटकांच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. जसे की, विश्लेषणात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक इत्यादींचा उल्लेख करता येईल. यापैकी प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. वसंतराव चव्हण यांच्या २००९ च्या निवडणुकीतील कामगिरींचा अभ्यास करणे.
२. वसंतराव चव्हण यांच्या २०१४ च्या निवडणुकीतील कामगिरींचा अभ्यास करणे.
३. वसंतराव चव्हण यांच्या २०१९ च्या निवडणुकीतील कामगिरींचा अभ्यास करणे.

**नायगाव विधानसभा निवडणूक २००९**

भारतामध्ये २००९ मध्ये महाराष्ट्र, हरियाना आणि अरूणाचल प्रदेश या तीन राज्याच्या विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्यात आल्या. महाराष्ट्रात १३ ऑक्टोबर २००९ मध्ये एकाच टप्प्यात निवडणुका घेऊन २२ ऑक्टोबर २००९ रोजी निवडणूक निकाल जाहीर झाला. निवडणूक निकालपूर्व मतदानोत्तर चाचणीत विविध वृत्तवाहिन्यानी पक्ष निहाय जागांचा अंदाज व्यक्त केला. यामध्ये आयबीएन लोकमत, सिव्होटर आणि स्टार माझा या तीन वृत्तवाहिन्यानी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला बहुमत मिळेल असा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात सत्तेत आला. सध्या अस्तित्वात असलेला नायगाव विधानसभा मतदारसंघाचा २००९ पूर्वी काही भाग मुखेड आणि बिलोली या मतदारसंघात समाविष्ट होता. त्यानंतर मतदारसंघ पुनर्रचनेत भोकर मतदार संघातील उमरी आणि धर्माबाद हे दोन तालुके नायगाव विधानसभा मतदारसंघाला जोडून नवीन नायगाव विधानसभा मतदारसंघ २००९ साली अस्तित्वात आला. २००९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे बापूसाहेब देशमुख गोरठेकर हे आघाडीचे अधिकृत उमेदवार होते. वसंतराव चव्हाण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे सदस्य असल्यामुळे त्यांना या निवडणुकीत शरद पवार यांनी तिकिट दिले नाही. मात्र वसंत चव्हाण यांनी राष्ट्रवादीसोबत बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढविली. या मतदार संघात पक्ष निहाय मिळालेल्या मतांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

**२००९ ची नायगाव विधानसभा निवडणूक निकालांचा तक्ता**

**तक्ता क्र. ३.१**

| **अ.क्र.** | **पक्ष** | **उमेदवारांचे नाव** | **मिळालेले मते** | **प्रमाण** |
|---|---|---|---|---|
| १. | अपक्ष | वसंतराव बळवंतराव चव्हाण | ६३,५३४ | ३७.१७ % |
| २. | राष्ट्रवादी | श्रीनिवास बापूसाहेब गोरटेकर | ५२,४१४ | ३०.६७ % |
| ३. | ज.सु. शक्ती | बचेवार बालाजी गणेशराव | १६,६८८ | ९.७६ % |
| ४. | भाजप | ठक्करवाड लक्ष्मण गंगाराम | १५,७८८ | ९.२४ % |
| | | **एकूण** | **१,७०,९१५** | **१००.०० %** |

वरील तक्ता व वर्तुळामध्ये नायगाव विधानसभा निवडणूक संघातील पक्ष निहाय उमेदवारांना प्राप्त मतांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, अपक्ष उमेदवार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांनी ६३,५३४ मते घेऊन विजयी झाले. त्याना एकूण मतांच्या ३७.१७ टक्के मते मिळाली. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्रीनिवास बापूसाहेब गोरटेकर यांचा ११,१२० मतांनी पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्रीनिवास बापूसाहेब गोरटेकर यांना ५२,४१४ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या ३०.६७ टक्के मते मिळाली आहेत. जन सुराज्य शक्ती पक्षाचे उमेदवार बचेवार बालाजी गणेशराव यांना १६,६८८ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या ९.७६ टक्के मते मिळाली आहेत. भारतीय जनता पक्षाचे उमेदवार ठक्करवाड लक्ष्मण गंगाराम यांना १५,७८८ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या ९.२४ टक्के मते मिळाली आहेत. अपक्ष उमेदवार बेळकोनीकर सुरेंद्र यांना ६७०५ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या ३.९२ टक्के मते मिळाली आहेत. बी.एस.पी. पक्षाचे उमेदवार बोधनकर शतीसकुमार यांना ३,३१३ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या १.९४ टक्के मते मिळाली आहेत. अपक्ष उमेदवार शामंते शंकरराव यांना २,०७६ मते पडले असून त्यांना एकूण मतांच्या १.२१ टक्के मते मिळाली आहेत. या निवडणुकीतील वसंतराव चव्हाण हे पहिल्यांदाच विधानसभेवर निवडूण गेले. पक्षातंर्गत बंडखोरीचा फायदा भारतीय जनता पार्टीचे उमेदवार ठक्करवाड लक्ष्मण गंगाराम याना होईल असे मानले जात होते. परंतु वसंतराव चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याच उमेदवारांचा पराभव करून आपण सक्षम असल्याचे दाखवून दिले.

**विधानसभा निवडणूक २०१४**

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने अभूतपूर्व यश मिळविले होते. त्यामुळे २०१४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अव्हानात्मक होत्या. यावेळी वसंतराव चव्हाण यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १५ ऑक्टोबर २०१४ रोजी सर्व महाराष्ट्रात एकाच टप्प्यात होऊ घातली. लोकसभेमध्ये अभूतपूर्व यश मिळाल्यामुळे भारतीय जनता पार्टीने २५ वर्षापासून शिवसेनेबरोबर असलेली युती तोडली. त्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना या चारही पक्षांनी स्वतंत्र निवडणुका लढविल्या. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने १२२ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष ठरला. शिवसेनेने ६३ जागा जिंकत दुसरा क्रमांक पटकावला. तर काँग्रेसला ४२ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागा मिळाल्या. यावेळी नायगाव मतदार संघातून वसंतराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढविली. या मतदार संघात पक्ष निहाय मिळालेल्या मतांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ३.२**

**२०१४ ची नायगाव विधानसभा निवडणूक निकालांचा तक्ता**

| अ.क्र. | पक्ष | उमेदवारांचे नाव | मिळालेले मते | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | वसंतराव बळवंतराव चव्हाण | ७१,०२० | ३५.८२ % |
| २. | भाजप | राजेश संभाजी पवार | ६०,५९५ | ३०.५६ % |
| ३. | राष्ट्रवादी | श्रीनिवास बालाजी देशमुख | ५७,२४७ | २८.८७ % |
| | | **एकूण** | **१,९८,२७४** | **१००.०० %** |

वरील तक्ता व वर्तुळामध्ये नायगाव मतदार संघातील पक्ष निहाय उमेदवारांना प्राप्त मतांची माहिती देण्यात आली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाची लाट असतानासुद्धा नायगाव मतदारसंघातून वसंतराव बळवंतराव चव्हाण यांनी ७१,०२० मते घेऊन भारतीय जनता पार्टीचे राजेश पवार यांचा १०४२५ मतांनी पराभव केला. त्याना मिळालेल्या मतांचे मूल्य हे ३५.८२ टक्के होते. तर दुसऱ्या स्थानी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राजेश पवार यांना ६०,५९५ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ३०.५६ टक्के होते. राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार श्रीनिवास बालाजी देशमुख यांना ५७,२४७ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य २८.८७ टक्के होते. बी.एस. पी. पक्षाचे उमेदवार इश्माईल सय्यद यांना ३,०९८ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य १.५६ टक्के होते. शिवसेना पक्षाचे उमेदवार बाबाराव अंबाराव यांना ३,०८७ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य १.५६ टक्के होते. नोटाला १,२७७ मते पडली असून हे मूल्य ०.६४ टक्के होते. बी.एम.यु.पी. पक्षाचे उमेदवार जळबा विठ्ठलराव गवळे यांना ७७९ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ०.३९ टक्के होते. अपक्ष उमेदवार शंकर पोशाती शांमते यांना ६३४ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ०.३२ टक्के होते. अपक्ष उमेदवार मारोती दत्ता गायकवाड यांना ५३७ मते पडली असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ०.२७ टक्के होते.

एकंदरीत महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीचे वातावरण असतानासुद्धा वसंतराव चव्हाण यांनी स्व कौशल्याने विजय संपादन केला. ही निवडणूक काँग्रेस पक्षाचे उमेदवार वसंतराव चव्हाण, भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राजेश पवार आणि राष्ट्रवादीचे उमेदवार श्रीनिवास देशमुख यांच्या त्रीशंकू झाली. या अतितटीच्या निवडणुकीत वसंतराव चव्हाण यांना ३६ टक्के, राजेश पवार यांना ३१ टक्के आणि श्रीनिवास देशमुख यांना २९ टक्के मते मिळाली.

**लोकसभा निवडणूक २०२४**

भारतात १८ वी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक १९ एप्रिल ते १ जून २०२४ रोजी सात टप्प्यात पार पडली. २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचा भाजपाने पराभव केला होता. त्यामुळे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप मजबूत स्थितीत होता. दुसरीकडे नांदेड मुलूक मैदानी तोफ अशोकराव चव्हाण भारतीय जनता पार्टीमध्ये दाखल झाल्यामुळे नांदेड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला मरगळ आली होती. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला उमेदवार शोधणे देखील मूश्कील झाले होते. कारण अशोकराव चव्हाण यांची संपूर्ण टिम भाजपमध्ये दाखल झाल्याने पूर्ण चित्र बिगडले होते. अशावेळी काँग्रेसने वसंतराव चव्हाण यांना लोकसभेची उमेदवारी देऊन रिंगणात उतरविले. प्रचारात भारतीय जनता पार्टीच्या वतीने महत्त्वाच्या नेत्याच्या सभा घेऊन आघाडी घेतली होती. त्या अशोकराव चव्हाण यांचे सुक्ष्म नियोजन असल्यामुळे सामना पूर्ण एकतर्फी होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु वसंतराव चव्हाण यांनी खचून न जाता पूर्ण ताकदिनीशी सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यावर भर दिला. निकाल जाहीर झाला तेव्हा वसंतराव चव्हाण यांनी अनपेक्षित यश मिळवून विजय संपादन केला. या निवडणुकीमध्ये पक्ष निहाय मिळालेल्या मतांची माहिती खालील तक्त्यात देण्यात आली आहे.

तक्ता क्र.३.३

**२०२४ ची नांदेड लोकसभा निवडणूक निकालांचा तक्ता**

| **अ.क्र.** | **पक्ष** | **उमेदवारांचे नाव** | **मिळालेले मते** | **प्रमाण** |
|---|---|---|---|---|
| १. | काँग्रेस | वसंतराव बळवंतराव चव्हाण | ५,२८,८९४ | ४६.८८ % |
| २. | भाजप | प्रतापराव गोविंद चिकलीकर | ४,६९,४५२ | ४१.६१ % |
| ३. | वंचित | अविनाश विश्वनाथ भोसिकर | ९२,५१२ | ८.२० % |
| | **एकूण** | | **११,२८,२५४** | **१००.०० %** |

वरील तक्ता व वर्तुळामध्ये नांदेड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूक निकालाची पक्ष निहाय माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, काँग्रेस पक्षाचे वसंतराव चव्हाण यांनी ५,२८,८९४ मते मिळवत भारतीय जनता पार्टीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिकलीकर यांचा ५९,४४२ मतांनी पराभव केला. त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ४६.८८ टक्के होते. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिकलीकर यांना ४,६९,४५२ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ४१.६१ टक्के होते. वंचितचे उमेदवार अविनाश भोसिकर यांना ९२,५१२ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ८.२० टक्के होते. बी.एस.पी.चे उमेदवार यांना ६,९०१ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.६१ टक्के होते. अपक्ष उमेदवार निखील गरजे यांना ४,३२५ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.३८ टक्के होते. वरीलपैकी नाही म्हणजेच नोटाला ३,६२८ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.३२ टक्के होते. अपक्ष उमेदवार नागेश गायकवाड यांना ३,३१८ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.२९ टक्के होते. अपक्ष उमेदवार भास्कर डोईफोडे यांना २,०८० मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.१८ टक्के होते. समाजवादी पक्षाचे उमेदवार सुशिला पवार यांना १,८९० मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.१७ टक्के होते. बी.जे.एच.पी.चे उमेदवार अबदुल अहमद यांना १,५१० मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.१३ टक्के होते. अपक्ष उमेदवार देविदास इंगळे यांना १,४७१ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.१३ टक्के होते. अपक्ष उमेदवार कल्पना गायकवाड यांना १,३१० मते मिळाले असून

त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.१२ टक्के होते. अपक्ष उमेदवार कौसार सुलतान यांना १,२१५ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.११ टक्के होते. अपक्ष उमेदवार साहेबराव गजभारे यांना १,१९३ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.११ टक्के होते. अपक्ष उमेदवार जगदिश पोतरे यांना ९६३ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.०९ टक्के होते. अपक्ष उमेदवार गजानन धुमाळ यांना ९५० मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.०८ टक्के होते. अपक्ष उमेदवार लक्ष्मण पाटील यांना ९२३ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.०८ टक्के होते. अपक्ष उमेदवार रुक्माबाई गित्ते यांना ९१३ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.०८ टक्के होते. ब.स. पार्टीचे उमेदवार हरी भोयले यांना ८७८ मते मिळाले असून त्यांना मिळालेल्या मतांचे मूल्य ००.०७ टक्के होते.

एकंदरीत प्रचारात भारतीय जनता पार्टीने घेतलेली आघाडी आणि अशोकराव चव्हाण यांचे सुक्ष्म नियोजन यामुळे प्रतापराव पाटील यांचा विजय सहज आहे असे सर्वत्र वाटत होते. परंतु वसंतराव चव्हाण यांनी सामान्य नागरिकांपर्यंत जाऊन प्रचार केल्यामुळे परिस्थिती बदलली. तसेच वसंतराव चव्हाण यांच्याकडे प्रचार यंत्रणा आणि जाहीरसभासुद्धा घेतल्या नाहीत. परंतु ही निवडणूक सामान्य नागरिकांने हाती घेऊन अशोकराव चव्हाण यांच्या विरोधात कल देण्याचे नियोजन आखले होते. सामान्य नागरिकांच्या मते, अशोकराव चव्हाण यांना पक्षाने सर्वकाही देऊनसुद्धा भाजपात गेल्यामुळे जनता त्यांच्यावर नाराज होती. यांचाच फायदा वसंतराव चव्हाण यांना झालेला दिसून येतो.

**सारांश**

वसंतराव जन्म राजकीय पुढाऱ्यांच्या घरात झाला असून त्यांना सामाजिक दर्जा, राजकीय वारसा आणि आर्थिक परिस्थिती उत्तम असलेली दिसून येतो. असे असले तरी त्यांच्यातील घराणे शाहितील घमंड किंवा कोणताही बडेजावपणा त्यांच्यात नव्हता. त्यांच्या नेतृत्वाची जडणघडण ही कृषी दुकान ते सरपंच, सरपंच तालुका अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, तालुका कृषी उत्पन्न सभापती, विद्यापीठ सिनेट सदस्य, जिल्हा बँकेचे अध्यक्ष, विधान परिषदेचे सदस्य, विधानसभेचे दोन वेळेस सदस्य आणि लोकसभेचे सदस्य असा त्यांचा प्रवास राहिला आहे. वसंतराव चव्हाण यांना घराणेशाहीचा आधार लाभला असला तरी त्यांनी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदापासून आपल्या नेतृत्वाची सुरूवात करून सर्वोच्च अशा भारतीय संसदेपर्यंत त्यांचा लोकशाही मार्गाने झालेला प्रवाश थक्क करणारा आहे. वसंतराव चव्हाण यांनी प्रत्येक पदावर काम करीत असताना सामान्य व्यक्तीला समोर ठेऊन त्यांचे प्रश्न व समस्यांची सोडवणूक केल्याचे दिसून येते. एकंदरीत वसंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीत आजोबा अमृतराव व वडील बळवंतराव यांचे योगदान असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

**संदर्भ**

१. महाराष्ट्र निवडणूक आयोग, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल २००९
२. महाराष्ट्र निवडणूक आयोग, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल २०१४
३. भारतीय निवडणूक आयोग, लोकसभा निवडणूक निकाल, २०२४